# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

**व्दितीय सत्र परीक्षा 2019–20**

**विषय – हिंदी**

**समय –2.00 घंटे** **वर्ग – 5(A,C,D,E,F,)** **गुण – 40**

---

**प्रश्न 1ला अ खालील उतारा वाचून त्याखालील आकृती पूर्ण करा.**

संध्याकाळच्या वेळेला दामूकाका घरी आले, ते हाका मारतच. ''वहिनी, अहो वहिनी.'' आईबाबा बाहेर आले. ''काय रे बाबा ? कपडे आणलेस का?'' जरा वैतागूनच आईने विचारले.

दामूकाकांनी खिशातून पैसे काढले. ''अहो वहिनी, तुमचे कपडे मी इस्त्रीला घेतले अन् कपड्यांच्या घड्यांमध्ये हे पैसे सापडले. ते परत करायला आलो. पैसे मोजून घ्या आणि हे कपडेही घ्या.''दामूकाका आईच्या हातात पैसे ठेवत म्हणाले. आईने पैसे मोजले.

''दामू पैसे बरोबर आहेत. तुझा प्रामाणिकपणा मला आवडला. '' बाबा म्हणाले. बाबा बक्षीस म्हणून दामूकाकांना 100 रूपये देऊ लागले, तेव्हा दामूकाका म्हणाले, ''नको भाऊसाहेब, आम्ही गरीब आहोत, पण कष्टानंच कमवून खातो.'' दामूकाका जायला निघाले. आईबाबा त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे कौतुकाने पाहत राहिले.

**अ) आकृती पूर्ण करा.** (1)

1) पैसे परत करणारे → [ ]

2) दामूकाकांना बक्षीस देऊ करणारे → [ ]

**आ) आकृत्या पूर्ण करा.** (1)

1) बक्षीस म्हणून देऊ केलेली रक्कम → [ ]

2) दामूकाकांचा कोणता गुण दिसला. → [ ]

**इ) कोण कोणास म्हणाले ते उताऱ्यातून पाहून लिहा.** (1)

1) ''तुझा प्रामाणिकपणा मला आवडला.''

2) ''आम्ही गरीब आहोत, पण कष्टानंच कमवून खातो.''

ई) तुम्हाला शाळेच्या मैदानात 10 रूपये सापडले, तर तुम्ही काय कराल? (1)

**प्रश्न 2 रा खालील उतारावाचून त्याखालील आकृत्या पूर्ण करा.**

अण्णासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव यमुनाबाई होते.

लहानग्या विठ्ठलला खेळाची अत्यंत आवड होती. हुतुतू, खो–खो, सुरपारंब्या, यांसारखे खेळ खेळण्यात लहानगा विठ्ठल सदैव पुढे असे. लहानपणीच्या या खेळांमध्ये विठ्ठलचा धीटपणा व सहनशीलता दिसून येई. त्याचे वडील धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या धार्मिक वृत्तीचा विठ्ठलवरही परिणाम झाला होता. सर्व जातिधर्मांचे लोक त्यांच्या घरी येत असत. माणसामाणसांत भेद करणे योग्य नाही, याचा संस्कार घरातील वातावरणामुळे लहानग्या विठ्ठलच्या मनावर उमटला.

**अ) आकृती पूर्ण करा.** (1)

1) अण्णासाहेबांच्या
- आईचे नाव — ________
- वडिलांचे नाव — ________

**आकृती पूर्ण करा** **(1)**

अ) विठ्ठल हे खेळ खेळत असत.
- ________
- खो – खो
- ________

**इ) आकृती पूर्ण करा.** (1)

लहानपणीच्या खेळांमध्ये विठ्ठलमध्ये दिसून येणारे गुण.
- ________
- ________

ई) तुम्हांला कोणते सामजिक कार्य करायला आवडेल ते लिहा. (1)

**प्रश्न 3 रा खालील कवितेच्या ओळीवाचून त्याखालील आकृत्या पूर्ण करा.**

पतंग उडवू चला,
गड्यांनो, पतंग उडवू चला.
रंग ढगांवर मावळतीचा,
लाल पिवळसर किती मजेचा,
झुळझुळ वारा नदीकाठचा,
बाजुस डोंगरमळा.
जशी पाखरे आभाळात
पंख पसरूनी तरंगतात,
दिसतिल तैसे पतंग रंगित,
खेळ किती चांगला!

**अ) आकृत्या पूर्ण करा.** **(1)**

1) सूर्य मावळण्याच्या वेळेस ढगांवर रंग दिसतो.
- ________

2) पतंग यांच्यासारखे तरंगतात.
- ________

**आ) आकृत्या पूर्ण करा.** **(1)**

कोण ते लिहा. → झुळझुळ — [ ]

कोण ते लिहा. → रंगीत — [ ]

**इ) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **(1)**

करू चला ------ ,

------ रीळ भराभर.

ई) पतंगाची तुलना कोणाबरोबर केली आहे? (1)

**प्र. 4 था खालील दिलेल्या कवितेच्या ओळी त्यावर आधारित आकृत्या पूर्ण करा.**

दरीदरीतून, वनावनांतुन
झुळझुळ मी वाहत येते,
मी मंजुळ गाणे गाते,
मी पुढेच धावत जाते.
वसली गावे तीरावरती,
त्यांना भेटुनि जाते पुढती,
लतावृक्ष किती काठावरती,
भूमितूनी जे मला भेटती.

**अ) आकृती पूर्ण करा.** (1)

नदी कोठून वाहत येते.

[ ] [ ]

**आ) आकृत्या पूर्ण करा.** (1)

1) मंजुळ गाणे गाणारी — [ ]

2) गावे वसली आहेत. — [ ]

**इ) जोडया जुळवा** **(1)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| 1) शीतल | अ) गाणे |
| 2) मंजूळ | ब) छाया |
| | क) पाणी |

**ई) नदी कोठे उगम पावते? कोठे जाऊन मिळते?** (1)

## व्याकरण विभाग

**प्र. 5 वा अ) खालील वाक्यातील नामे ओळखून लिहा.** (1)

1) कितीतरी पक्षी झाडांवर बसले होते.

**आ) खालील वाक्यांतील सर्वनाम ओठखून लिहा.** **(1)**

1) आम्ही सहलीला जाणार नाही.

2) ती दररोज शाळेत येते.

**इ) रिकाम्या जागी योग्य क्रियापदे लिहा.** (1)

1) सुधीर गोष्ट ---

2) ते झाड उंच ----

**ई) तक्ता पूर्ण करा.** **(1)**

| | | |
|---|---|---|
| पुल्लिंग ⟶ | कुत्रा | .......... |
| स्त्रीलिंग ⟶ | .......... | घोडी |

**उ) तक्ता पूर्ण करा.** **(1)**

| | | |
|---|---|---|
| एकवचन ⟶ | मेणबत्ती | |
| अनेकवचन ⟶ | | बागा |

**ऊ) खालील जोडशब्द लिहा.** **(1)**

जसे :- गोर - गोरगरीब

1) काम - 2) गोड -

**ए) खालील दिलेल्या शब्दांचे कंसातून पाहून समानार्थी शब्द लिहा.** (1)

(वृक्ष, सुगंध, पुष्प)

1) सुवास = 2) झाड =

**ऐ) खालील कंसातून पाहून विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

(कुरूप, अवगुण, जलद)

1) गुण X 2) सुंदर X

**प्र. 6 वा खालील चौकटीत काही अक्षरे दिली आहेत. त्यापासून अर्थपूर्ण उभे व आडवे चार - चार शब्द बनवा.** **(4)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| झा | ड | वि | मा | न |
| डू | बा | ळी | क | ळ |
| पं | स | म | ड | के |
| खा | री | क | णी | स |
| क | ळ | प | तं | ग |
| पा | न | दी | गा | य |
| ट | र | बू | ज | ऊ |
| ह | वा | ध | र | स |

उभे शब्द

1)

2)

3)

4)

आडवे शब्द

1)

2)

3)

4)

**प्र 7 वा अ) पुढील कोणत्याही एका विषयावर मुद्दयांच्या आधारे निबंध लिहा.** **(4)**

1) दिवाळी :- (दिवे - कंदील - फटाके - फराळ - रांगोळी - नवीन कपडे - मौज )

**किंवा**

2) राष्ट्रीय पक्षी :– मोरः– (पक्षी – रंग – आवाज – पिसे – नाच – अन्न)

किंवा

3) फळांचा राजा आंबा :– (फळ – रंग – वास – राजा – चव – आमराई – पदार्थ – प्रकार)

**प्र. 8 वा पुढील पत्राचा नमुना तयार करा. (कोणतेही एक)** (4)

1) तुमच्या वाढदिवसाचे आमंत्रण देण्यासाठी तुमच्या मैत्रिणीला पत्र लिहा.

**किंवा**

2) शाळेच्या वस्तुभंडारासाठी पुस्तके हवी आहेत. त्यांची मागणी करणारे पत्र पुस्तक विक्रेत्याला लिहा.

**प्र. 9 वा खालील कंसातील शब्दांचा वापर करून गोष्ट पूर्ण करा.** (4)

(ससा, कासव, धावण्याची शर्यत, जोराने धावत, कासव ससा, हिरवीगार, झुडपे, पाने, आराम, ससा, हळूहळू, सशाला, कासव, ससा, कासव)

**ससा व कासव**

एक होता –– व एक होते –– एकदा त्या दोघांमध्ये –– लागली. ससा –– पुढे गेला हळूहळू चालणारे –– मागे पडले. –– कासवाच्या खूप पुढे गेला. वाटेत सशाला –– दिसली. हिरवीगार –– करावा म्हणून –– झाडाखाली झोपला. –– कासव मात्र –– पुढे जात होते. ते वाटेत कुठेही थांबले नाही अखेर ठरलेल्या ठिकाणी ते पोहचले. थोड्या वेळाने –– जाग आली. उठून तो पळू लागला ठरलेल्या ठिकाणी आला. बघतो तर काय, –– त्याच्या आधीच पोहचले होते. अशा प्रकारे –– शर्यत हरला व –– शर्यत जिंकले.

***